# प्रकरण : 2
# अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रे

प्रस्तुत प्रकरणामध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रांच्या विचार करावयाचा आहे. अरुण काळे यांच्या कवितेच्या अभ्यासासाठी निवडलेल्या तीन कवितासंग्रहाच्या लेखनातून प्रथम जाणवते ते हे की, अरुण काळे यांच्या कवितेत आशयसूत्रांची विविधता दिसून येते.

1980 नंतरच्या काळातील अरुण काळे हे महत्त्वाचे कवी असून त्यांचे 'रॉकगार्डन' (1993), 'सायरनचे शहर' (1997) आणि 'नंतर आलेले लोक' (2006) हे तीन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या या कवितासंग्रहामुळे दलित कवितेला नवी दिशा मिळाली आहे. 1980 नंतरच्या कवितेत नवे त्रळण देणाऱ्या कवींमध्ये काळे यांची कामगिरी महत्त्वाची आहे. काळ्यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसून येते. काळे यांची वाङमयीन भूमिका विचारात घेवून त्यांच्या कवितेतील आशयसूत्रांचा वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. काळ्यांची सामाजिक जाणीव क्रेंद्रस्थानी ठेवून या कवितेचा विचार केला आहे.

1980 नंतरच्या दलित कवितेत भुजंग मेश्राम, लोकनाथ यशवंत, लहू कानडे, प्रज्ञा लोखंडे, महेंद्र भवरे इत्यादी कवींनी काव्यलेखन केलेले दिसून येते. काळे यांची कविता तिच्या वैशिष्ट्यपूर्णतेपणे या सर्व कवीत अधिक उठून दिसणारी आहे. त्यामुळे अरुण काळे हे महत्वाचे कवी वाटतात.

प्रस्तुत प्रकरणात आशयसूत्रांचा शोध घेतलेला दिसतो. खालीलप्रमाणे आशयसूत्रांची मांडणी केलेली आहे.

1. आंबेडकरी विचार प्रेरणा
2. जागतिकीकरण
3. स्त्रीजीवन

4. महानगरीय जीवन
5. जातीय ऐक्याची जाणीव
6. आर्थिक विषमता आणि चंगळवादी वृत्ती

या आशयसूत्रांचा प्रस्तुत ठिकाणी विचार करावयाचा आहे.

## 1. आंबेडकरी विचार प्रेरणा

अरुण काळे यांच्या कवितेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे व्यक्तिचित्रण घडून येते. काळे यांनी आपल्या कवितेतून दलित वर्गाचे चित्रण केलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा पाढा काळे यांच्या पिढीपर्यंत दलित कवितेच्या स्वरुपात घेवून आलेली आहे. ती स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर होवून वास्तवाचे भान ठेवून त्यावर विचार करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्गाला प्रेरणा दिली. काळे यांच्या कवितेतून आंबेडकरी विचारधारा व्यक्त होतात. या जगाला ज्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी घडवणारे त्यासाठी खूप प्रयत्न करणारे त्यांना मार्ग दिशा दाखविणारे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श व्यक्तिमत्व होवून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्गाला न्याय मिळवून देवून अन्याय दूर केला.

1960 नंतरच्या कालखंडात दलित साहित्याला एक नवी दिशा मिळली. दलित कविता ही एक अंबेडकरी विचारांची कविता आहे. दलित कविता ही शीलतेवर आधारलेली कविता आहे. दलित कविता ही दलितांच्या पार्श्वभूमीतून जन्माला आलेली आहे. दलित कविता ही समाजाशी बांधिल आहे. दलित कवितेचा प्रवाह हा वेगळा आहे आणि तो स्वतंत्र आहे. दलित कविता ही एक क्रांतीवादी कविता आहे. दलित कविता ही दु:ख,अपमान, अत्याचार, अन्याय यांच्या आगींच्या ज्वालातून भाजून निघालेली कविता आहे. दलित कवितेत संघर्ष, आक्रमकपणा आहे म्हणून या कवितेला एक वेगळे स्वरुप निर्माण झालेले दिसून येते. दलित कविता जीवन जगणाऱ्यांची कविता आहे. दु:खाचे वास्तव निर्माण झाले आहे. त्याचबरोबर ती तारुण्य आणि जागरुक मनाची कविता आहे. दलित कविता ही आज नव्या जाणीवांतून निर्माण झालेली आहे. दलित कवितेला अनेक कवींचे योगदान लाभलेले दिसते.

त्यांमुळे दलित कवितेत कवींचा प्रभाव दिसून येतो. कवींना दलित कवितेविषयी खूप आस्था वाटते. त्यामुळे दलित कवितेला एक नवी दिशा मिळालेली दिसून येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अंगी असलेल्या प्रज्ञा, प्रतिज्ञा आणि विद्वता या गुणांची महानता एखादया प्रतिभावंत कवींच्या अंगी नसेल तर तो त्यांचे व्यक्तिमत्व आपल्या प्रज्ञेच्या, प्रतिभेच्या, प्रतिमेच्या आणि विद्वतेच्या कवेत घेवू शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विषयी असणारी कोणतीही कविता शेवटची असणार नाही. या महान व्यक्तीच्या चित्रणाचा शोध अरुण काळे यांनी कवितेतून घेतलेला दिसून येतो.

*" आमच्या डोक्यात बसविला त्याने*
*महासंगणक बुध्दिप्रामाण्याचा*
*वैज्ञानिक पध्दतीचा*
*माणसाची सर्वांगीण वाढ करणाऱ्या*
*पोषक तत्वांचा"*

( आता आम्ही / रॉकगार्डन - 58 )

काळे यांची कविता सामाजिक जीवनपूर्ण आणि फुले-आंबेडकरी यांच्या विचाराने निर्माण झालेली कविता आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक स्वभावी प्रतिमा कवितेतून दिसून येतात. त्यातून या कवीच्या जीवनातील आदर्श समोर येतो.

*" जखमांना खतपाणी घालणारे*
*प्रदेश नाकारुन*
*मुळासकट सर्व जखमा*
*घेऊन आलोय मी*
*बोधिवृक्षाच्या निर्जंतूक सालवीत "*

( आता आम्ही / रॉकगार्डन - 58 )

या निर्जंतूक सावलीत आणून बसविण्याचे ऐतिहासिक काम, त्या दिशेतून जाण्याचा मार्ग डॉक्टरच्या दिशादर्शी बोटाने दाखवला अशी विसाव्या शतकाची दिशादर्शक आंबेडकरी प्रतिमा अरुणच्या कवितेने मांडलेली आहे. या प्रतिमेने अनेक व्यवस्थेच्या मुळाक्षरांचे अर्थच बदलले ज्ञानाचा प्रकाश पसरल्यामुळे ज्ञान आणि अज्ञान यांतील फरक समजला.

दलित कवितेत सूर्य ही प्रतिमा सतत येवू लागली अनेक कवींनी मुक्ती उत्थान याचे प्रतीक म्हणून सूर्याकडे पाहिले. काळे यांच्या कवितेत भीमराव आंबेडकर यांचा त्यांनी विचार केला.

*" सूर्यानेही स्वत:ला*
*भीमराव म्हणवून घ्यावं*
*एवढं तुझं मोठेपण"*

(तुझ्या जन्मदिनी / रॉकगार्डन - 44 )

सूर्याने माणसाला जगणे दिले. पण माणूस म्हणून राहण्याची शिकवण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिली.सूर्याने प्राणी-मात्रांना जीवन दिले, पण आंबेडकरांनी मान-सन्मान दिला, जगायला शिकवले. त्यामुळे अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा नवा मार्ग दाखवला.

आंबेडकरी वास्तवामध्ये विरोधी असलेली प्रवृत्ती, भाववृत्ती, विचारवृत्ती प्रकट होते. या विचारधारा भारतीय असूनही त्यामध्ये अटळ संघर्ष आहे. जातीसमाजाने किंवा जातीवास्तवाने निर्माण केलेल्या संस्कृतीमुळे भारताचा इतिहास दु:खाचा झाला. पण कनिष्ठ लोकांचे खूप नुकसानही झाले. आंबेडकरी वास्तवामुळे वरिष्ठ वर्गातल्या गरिबांचे, स्त्रियांचे शेकडो प्रश्न सहजासहजी सुटलेले नाहीत. जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमूळे जातीचा टाकून वरीष्ठ जातीचे व्यवसाय करणारे मध्यमवर्गीय निर्माण झाले. हा मध्यमवर्ग बाबासाहेबांना शेतमजुरातून आणि मजुरातून निर्माण झाला. तो मध्यमवर्ग ज्यातून निर्माण झाला. त्याच वर्गातून अरुण काळे निर्माण झालेले आहेत.

दलित कविता ही भारतीय कविता असूनही तिच्याएवढे विश्वव्यापकत्व मराठी कवितेत आढळत नाही. अरुण काळे यांच्या कवितेतील हे कवितासंग्रहाच्या नावापासून व कवितांमधूनही आपणाला दिसते. काळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणींना उजाळा दिलेला आहे. काळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णन करताना आपल्या कवितेत बाबासाहेबांच्या क्रांतिकारी तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केलेला दिसून येतो. आंबेकरांची दलित कवितेला दिलेली विचारांची प्रेरणा ही खूप मोलाची असल्याची दिसून येते. अरुण काळे यांची कविता ही चळवळीशी कायम नातं राखून असलेली आंबेडकरी कविता आहे.

*"तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा*
*आणि मल्टिमिडीया की-बोर्ड*
*हा संगणक ही मेमरी अन अपडेट*
*प्रोग्रॅमही, तूच दिलेला"*

( तू मदरबोर्ड माझ्य संगणकाचा / नंतर आलेले लोक - 37 )

मानवाच्या परंपरेत गिळून टाकण्याचा प्रयत्न करणारी संस्कृती, जीवनवृत्ती, नशीब, कर्म आणि अशा स्वरुपाच्या अनेक घटनांनी माणसात शांत ठेवणारी हुकूमशाही, सृष्टीत नसंलेल्या एकमेकांविरुध्द ठरवून कर्माची चांगली कपडे वापरुन माणसाला बेशुध्द करणारी व्यवस्था याविरुध्द 'मूल्य' या पातळीवरील संघर्ष अशा परंपरेचा निषेध केलेला दिसून येतो. या वर्तमान काळाच्या भाषेतून भेदक चित्र काळेंनी त्यांच्या कवितेत रेखाटले आहे. तसेच इथे कवींनी रमाबाईंची आठवण करुन दिलेली आहे. रमाबाईंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मोलाची साथ दिलेली दिसते. रमाबाईंनी स्त्रीयांच्या जीवनाशी एकरुप होवून स्त्रीयांना मदत केलेली दिसते.

*"भौतिक जगाच्या सुखाच्या*
*भिंती ओलांडून*
*स्त्रीमुक्तीच्या उद्‌गात्याची पाठराखीण*
*किती एकरुप होवून*
*अंग चोरुन बसलीस*
*त्या ग्रुपफोटोतही*
*बुध्द स्त्रीसारखी शांतपणे. . .*
*विकारांवर विजय मिळवलेली "*

( रमाई / सायरनचे शहर - 46 )

बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या मध्यमवर्गातून प्रारंभीच्या काळी दलित ब्राम्हणांचा वर्ग निर्माण झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दडपलेल्या,चिरडलेल्या समाजाला न्याय मिळवून दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी परंपरेच्या आंदोलनाची प्रणाली अरुण काळे यांनी कवितेतून रेखाटली आहे. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्गाला दिलेली प्रेरणा अरुण काळे यांच्या कवितेतून प्रकट होते. अरुण काळे यांच्या कवितेतील आंबेडकरीय विचार प्रेरणेचे महत्त्व विशद करताना मोतीराम कटारे म्हणतात, "फुले - आंबेडकरी चळवळ ही समग्र माणसाच्या उत्थापनाची, त्याच्या विकासाची चळवळ आहे. ही चळवळ माणसाचे माणूसपण जपते. कवीने आपली लेखनी अशीच माणसाच्या बाजूने चालवलेली आहे. 'रॉकगार्डन' पासून सुरु झालेला हा प्रवास 'नंतर आलेले लोक' पर्यंत अव्याहत सुरु राहिला. चळवळीचा जाहीरनामा म्हणून घोषित करावा एवढी श्रेष्ठ ही कविता आहे. माणसाच्या हिताच्या जे चळवळी करतात, त्यांना अरुण काळेंनी दिलेला अजेंडा स्वीकारल्याशिवाय भवितव्य नाही. जर त्याचा अजेंडा स्वीकारला गेला नाही तर तो म्हणतो त्याप्रमाणे, माणूस भंगारात निघाल्याशिवाय राहणार नाही. माणूसच भंगारात निघाला तर चळवळीचे भवितव्य काय असेल, असे सांगायला कुणा तत्ववेत्याची गरज नाही. एक मात्र खरे की, अरुण काळेच्या कवितेतून चळवळीचे जे तत्वज्ञान येतं, ते तत्वज्ञान ज्याने समजून घेतलं तो, अरुण काळे हा नुसताच कवी नव्हता तर तत्वज्ञ कार्यकर्ताही होत, असे प्रशंसोद्‌गार काढल्याशिवाय राहणार नाही."[1]

## 2. जागतिकीकरण

काळे यांच्या कवितेने अनेक जाणिवा व्यक्त केलेल्या आहेत. जगाच्या पाजळीवर इतिहासाच्या काळापासून ते वर्तमानकाळापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी लुटमार करुन स्थानिक लोकांना गुलाम बनवले किंवा त्यांना त्यांच्याच गावातून हाकलून दिले. अशा सर्व घटकांनी काळे यांची कविता स्पष्ट झाली आहे. यावरुन त्यांच्या कवितेचे क्षेत्र किती मोठे आहे याचा प्रत्यय येतो. अरुण काळे यांच्या कवितेत जागतिकीकरणाचे आशयसूत्र ठळकपणे प्रकट झाले आहे. जागतिकीकरणाची पार्श्वभूमी सांगताना नितिन भरत वाघ म्हणतात, " आज कार्पोरेट आणि मल्टिनॅशनलवाले उत्पादनांचे अवास्तव भ्रामक मायाजाल विणून आर्थिक उदारीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या नावाखाली सगळ्या जगावर हुकूमत त्यासाठी नेमकी काय किंमत आपण गाजवतायत. एक प्रकारे स्वत:ला जगवण्यासाठी ते शोषितांची रोपं विकसीत करण्याचा प्रोग्राम राबवतायत. एक चेहरा नसलेला भेसूक मानवीकृत आकार आजच्या जागतिकीकरणाच्याआड दडला आहे. जागतिकीकरणात सगळ्यात महत्त्वाची भूमिका बहुराष्ट्रीय कंपन्या बजावत असतात. आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी सगळ्या जगालाच एका मोठ्या बाजारपेठेचे स्वरुप त्या देतायत. ख्रिश्चन मिशनरी ज्या निष्ठेने आपला धर्म सर्वदूर पोहोचवण्याचे काम करत असतात, त्याच निष्ठेने मल्टिनॅशनलवाले आपली उत्पादनं पोहचवत असतात. फरक एकवढाच आहे की मिशनरी मेन स्ट्रीममध्ये किंवा मेट्रोत आपले काम सुरु ठेवू शकत नाहीत, मात्र मल्टीवाले यंत्र तंत्र सर्वच पोहचू शकतात. जागतिकीकरण म्हणजे अलिबाबाच्या गुहेसारखे आहे आणि भारतीय समाज म्हणजे त्या गुहेत घुसलेल्या कासिमसारखा आहे. त्याला घुसायचा मंत्र माहीत आहे, मात्र बाहेर निघायचा नाही. बुभुक्षित अशा भारतीय समाजाला सजवून धजवून ताट समोर मांडले असताना तो त्यावर तुटून पडला नसता तरच नवल होते. वैज्ञानिक भौतिक बदलांच्या काळात जीवनमान पध्दती बदलण्याच्या काळात देशाने बदललेच पाहिजे. मात्र ते बदल स्वीकारतांना त्या बदलांसाठी, नव्या पध्दतीच्या समाजरचनेसाठी तो समाज तयार आहे की नाही याची चाचपणी

करुन योग्य तो अदमास घेऊनच ते बदल रुजवणे गरजेचे असते. तसे आपल्या उंटावरुन शेळ्या हाकणाऱ्या राजकारण्यांनी केलेले दिसत नाही. कारण प्रलोभनांची एवढी खुल जा सिम सिम असेल तर सामान्य नागरीक तिला बळी पडला नसता तरच नवल ! या सगळ्या प्रलोभनांची, अनावश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी भारतीय समाजाने कुठल्याही प्रकारची लाज, तमा बाळगायचीच नाही असे ठरवलेले दिसते. कुठल्याच तऱ्हेची नैतिकता या समाजात शिल्लक आहे की नाही, असे प्रसंग, घटना रोजच्या रोज आपल्याला पहायला मिळत आहेत. वैयक्तिक महत्त्वकांक्षानाही काही सीमारेषा उरलेली नाही. या सगळ्याचा एकत्रित परिणाम समाजात ढासळणाऱ्या मूल्य ऱ्हासात आपल्याला दिसतोच आहे. ज्या काही भौतिक व आर्थिक सुधारणा आपण घडवून आणतोय, ज्या गोष्टी जागतिकीकरणाद्वारे प्राप्त करतोय, त्यासाठी नेमकी काय किंमत आपण चुकती करतोय, याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपलीय."[2]

अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' कवितासंग्रहात हे आशयसूत्र अधिक ठळकपणे दिसून येते. शहरातील वाढलेला ताणतणाव, वाढती लोकसंख्या, वस्त्या, राजकारण, समाज, धर्म, टोळया, दहशत, क्रूरता यामूळे जागतिकीकरण टिकवणाऱ्या सर्वाच्या जळण्याचा वास येतो आहे.

*"नागरसंस्कृतीचे हे शहर अभिमानी,*
*आरस्पानी*
*गोसायाच्या शेट्टावाणी*
*या शहरात आपण केव्हांही*
*होऊ शकतो भुईसपाट"*

(मी विसावा मागतो शहराकडे / सायरनचे शहर - 64 )

या शहरात हिंस्त्र आणि अमानुष शक्तीचे प्रबळ वाढल्याचे दिसून येते.या जागतिकीकरणामुळे शहराचा तोल ढळतो आहे. जागतिकीकरण हा मानवी जीवनावर बेतलेला एक हिंसात्मक घटक आहे.

*''टोळया :*
*एक रिमोट कंट्रोल*
*सैतानांच्या हातातला*
*नगराच्या पाठीवर बसलेला*
*भीतीची आरी टोचीत,*
*कळप हाकणारा. ''*

(गँगवार / सायरनचे शहर - 6 )

जागतिकीकरणामुळे नोकरशाही ,सावकारी या सर्वांनी प्रदेश पोखरला आहे. म्हणून हा प्रदेश काळ्यांना म्हाताऱ्या त्वचेसारखा दिसतो. संगणकक्षेत्राने सर्वाची जीवनसरणी बदललेली आहे आणि भाषेवर देखील परिणाम घडून आलेले आहेत. वृत्तपत्रे आणि विविध चॅनेल्सनी भारतीय जीवन अंर्तमाध्यमातून पोखरुन निघाले. जुनी मुल्यमापने गेली. बाप आणि मुलगा परस्परांना ओळखेनासे झाले. माणुसकी कमी -कमी होत चाललेली दिसून येते. समाजातील प्रत्येक घटकांमध्ये सत्तेचे केंद्र आपल्याकडे ओढण्याची भावना पुढे येऊ लागली. काळे यांनी कवितेत अशा प्रकारच्या मानवी जीवनाच्या संघर्षाचे त्यांच्या जीवनासंबंधीचे विचार मांडलेले दिसतात. गौरवर्णीय, मध्यमवर्गाच्या पलीकडे कामगारवस्तीच्या पुढे झोपडपट्ट्यांचे जग निर्माण झाले आहे. त्यांनी त्यात मानवी जीवनाच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन केलेले दिसून येते.

*''बजाऽऽऽ व, नाचोऽऽऽ*
*झिंग लपालपालपा, झिंग लपालपा*
*खुल्क है खुदाका आणि मुल्क जनताका*
*हुकूम कंपनीका, नाचो झिंग लपालपा*
*घुंब घुंब नका नका, झिंग झिंग लपालपा ''*

(मल्टीलुटालुटीचा झिंग लपालपा / नंतर आलेले लोक - 96 )

आजच्या काळात जागतिकरणाची सावली पसरलेली आहे. नवी संस्कृती आणि जागतिकीकरणामूळे सामान्य माणूस घाबरुन गेला आहे. खूप मोठा लढा साऱ्या जगभर सुरु आहे. जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या नवस्संस्कृतीच्या खाणाखुणा, खाण्यापिण्यातून,

रिती-रीवाजांतून, आचार-विचारातून, फॅशन्समधून प्रर्दशनातून, कलाकडे बघण्याच्या वृत्तीतून, जीवनसृष्टीतून दिसू लागले आहेत.

'पाणी' या शीर्षकाच्या काळे यांच्या तीन कविता आहेत त्यात अनेक गुंतागूंत आणि नवीन काळातील तंत्रज्ञानाने विचित्रावस्थेत अडकलेल्या समाजाचे हे वर्णन करतात.

जेव्हा एकेकाळी इथे येवून इथल्या स्थानिक लोकांना लाचार,गुलाम बनवणारे आर्य लोक,त्याच्यानंतर आलेले परकीय जातीचे सत्ताधारी लोक, त्यांच्या बरोबर ज्यांनी देशाची सत्ता हडप केली त्या लोकांनी नंतर जागतिकीरणाच्या जोरावर गरीब राष्ट्रातील सामान्य लोकांना गरीब, दारिद्रय, दलित केले. त्यांच्या साठी अरुण काळे यांची कविता बोलते आहे. स्वाभाविकपणाच्या किंकाळ्यातून इतिहासातील पराभूताचा विनाशक कल आणि जीवाच्या आकांतातील गुदमरलेला माणूस या दोन गोष्टी अरुण काळे यांच्या कवितेत व्यक्त झालेल्या आहेत. वंश, जात, वर्ण, लिंग, भेद, धर्माच्या नावावर केल्या जाणाऱ्या लोकांचे बळी ठरले होते ते आज माहितीच्या घटनेमुळे सर्वात वाईट दृष्ट्या बळी पडत आहेत. काळ्यांच्या कवितेतील विचार साचेबंद चौकटीत बसणारे नाहीत तर त्यामागे त्यांची वेगळी भूमिका असते. तर आजच्या माणसांविषयीची नैतिकता ते अचूकपणे आपल्या कवितेतून मांडतात. त्यामुळे त्यांच्या कवितेने एकूण कवितेत स्वत:चा एक वेगळा ठसा निर्माण केलेला दिसून येतो.

भास्कर लक्ष्मण भोळे म्हणतात त्याप्रमाणे - " अरुण काळे यांची कविता जागतिकीकरणाच्या बाजारसंस्कृतीवर बोलते, माहितीक्रांतीचे अंतरंगही उलघडून दाखवते आणि त्या क्रांतीच्या अग्रक्रमात ज्यांचे अगतिकीकरण झाले आहे त्यांच्या प्रश्नांनाही वाचा फोडते पण ती कुठेही वक्तृत्वपूर्ण किंवा निबंध वजा वाटत नाही, कारण तिचे कवितापण तिला कधीच सोडून जात नाही. महत्त्वाच्या सामाजिक-राजकीय प्रश्नांसंबधी सांगतांनाही वाचकाला काव्यात्म अनुभवाची अखंड प्रतीती देण्याची किमया आज हयात असलेल्या कवीपैकी नामदेव ढसाळांच्या खालोखाल अरुण काळ्यांनाच साध्य झाली आहे. त्यांच्या कवितेला जे सांगायचे असते ते ती तर्ककर्कश व आव्हान-आवाहनात्मक गद्यसदृश मजकुरातून नव्हे तर प्रत्यक्ष

अनुभवांच्या व प्रसंगांच्या स्वरुपात सांगते. तिथेही तपशील प्रवण निरुपणापेक्षा अनुभव-प्रसंगाच्या अमूर्तिकरणाचाच तिचा प्रयत्न असतो. कशाबद्दलही सांगतांना तिची अंतर्गत लय कुठेही भंग पावत नाही, किंवा तिच्या शब्दकळेतील सूचकता व बव्हर्थता जरासुध्दा उणावल्याचे आढळत नाही... सर्वत्र बोकाळलेला पाशवी अप्पलपोटेपणा, प्रत्येकाची न संपणारी भूक, साध्येच तेवढी महत्त्वाची मानून ती कोणत्याही सूक्तासूक्त मार्गांनी पदरात पाडून घेणे हाच पुरुषार्थ, बळी तो कान पिळी हा जंगलचा कायदा, त्यात दुबळ्यांचे अटळ झालेले मरण, त्याबद्दल कोणालाही ना खेद ना खंत, सबळ-सधनांचा चंगळवाद आणि बेपर्वा राजकर्त्यांचा सत्तेचा सोस या आजच्या भयानक वर्तमानावर झगझगीत प्रकाशझोत ही कविता टाकते."[3]

'नंतर आलेले लोक' मधील कविता जागतिकीकरणाचा भेसूर चेहरा आपल्यासमोर उलगडून दाखविते.

*"माहितीच्या स्फोटात उडतात जाहिरनामे*
*माहितीच्या बैलाना माणूस नाही माहित*
*आज किती अर्थपोटी, झोपलेत, आज किती*
*जागे आहेत. पोट धरुन चालू*
*आर्थिक वर्षात*
*किती जणांची झाली अवहेलना"*

(माहितोचे माहितगार / नंतर आलेले लोक -13)

दलित, गरीब, दरिद्री, कष्टकऱ्यांच्या वाटेला फक्त दुख:च येत आहे. हे कवी पाहतो. हवा, पाणी, अन्न या मुलभूत गरजा सामान्यांच्या पुऱ्या होत नाहीत. या गरजांसाठी सामान्य माणूस हा पुन्हा पुन्हा तडफडतो आहे. त्याच्या वाट्याला कमालीची उपेक्षा-अवलेहना येऊ लागलीय.

*"ही सनातनी मोड्स ऑपरेंडी*
*ही उपेक्षा, ही अवहेलना*
*ही पाताळयंत्रे, ही खुन्नस*
*हे वैचारिक चळवळींचे कब्रस्तान*

*हे जागतिकीकरण''*

(सनातन मोड्स ऑपरेंडी / नंतर आलेले लोक -13 )

सतत माणूस हा मोबाईल, संगणक अशा गोष्टींच्या जवळीक आल्यामूळे त्याचे जीवनही यंत्राप्रमाणे र्निजीव होत चालले आहे. त्यामूळे एका बाजूला माणूस हा आळशी होत आहे. तर दुसऱ्या बाजूला तो भावनिकदृष्ट्या कोरडा बनत चालला आहे.

*''टर्मिनेटसारखी प्रजनन क्षमता नसलेली*
*माणसे बाजारात आली*
*कृत्रिम पावसाच्या कवितांना*
*राज्यपुरस्कार मिळाला.*
*काही कवितांचे रिमिक्स झाले*
*डीजीटल काव्यसंग्रह आले''*

(प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण / नंतर आलेले लोक - 39-40 )

किंवा

*''मावशे तुझ्या दुधाच्या पिशव्यांना*
*घेत नाही कुणी*
*काढू नको उणीदुणी, भीक तुझं अन्नपाणी*
*बाकीच्यांनी सेवा करा, टोल भरा,*
*बांधा, वापरा हस्तांतरीत करा,*
*म्हायतीचा घनकचरा कितीही साठो*
*कंडोमच्या घंटागाडीत पाठवतो आम्ही''*

(आयटीचा रेडलाईट एरिया : झलक/नंतर आलेले लोक - 42-43)

अशा जागतिकीकरणामुळे आणि माहिती -तंत्रज्ञान या गोष्टींच्यामूळे माणसाचे जीवन अंतर्बाह्य पूर्णपणे बदलून गेले आहे. नव्या जगातील सामान्य माणसाची व्यथा मांडताना अरुण काळ्यांची कविता अधिकच अस्वस्थ होते.

*''ही एक खिडकी योजना*
*हे काय खरं काय खोटं*
*दारातून नाव - गाव विचारलं जाई*
*खिडकीतून विचारतात पासवर्ड*
*दारं -खिडक्यांशी ज्यांचा संबंध नाही*
*असे कितीतरी लोक झोपतात उघड्यावर*

*कोण बघतो त्यांना ओझोन मिळतो*
*की नाही ? ''*

(खिडकी उर्फ विण्डो / नंतर आलेले लोक - 23 )

जागतिकीकरणामूळे जग बदललेले दिसून येते. या नव्या जगात प्रवेश करता येतो. पण बाहेर पडता येत नाही पण बाहेर पडण्याचा 'पासवर्ड' हा माणूस विसरला आहे.

*'' हे काय खरं, काय खोटं*
*मी कुठवर जातोय आत आत*
*मी माझं जगं शोधायला निघालेला*
*मी रस्ता हरवलेला*
*मी भाऊ अलिबाबाचा*
*खुल जा सिम सिम.... विसरलेला ''*

(खिडकी उर्फ विण्डो / नंतर आलेले लोक -.23 )

जागतिककरणामुळे जगाचे दोन भाग झालेले आहेत. या दोघांचा एकमेंकाशी संबंध राहिलेला नाही. या नव्या कोरड्या जगात

*'' एका माणसाचा झाला एक समाज*
*दोघांचे दोन समाज, शंभराचे शंभर*
*सगळी नाती आली चोरबाजारात*
*विचारवंत फिरु लागले गुरख्यासारखे*
*डांबरीकरणासारखा उखडला पुन्हा पुन्हा*
*रस्त्यातला माणूस*
*प्रेमाला डाबलंय देवळात*
*द्वेषाला एकसेंज ऑफर द्वेषाचीच*
*प्रेमाच्या भरुन येत नाहीत ट्रक्स्*
*ट्रेन,विमानं आणि जहाजं*
*हवा-पाणी राहिले नाही सर्वांचे*
*रस्ते वाटा राहिल्या नाहीतं सर्वांच्या*
*जगाचं ग्लोबल गाव केलंय ना*
*तर प्रेमाचं होऊ द्या ना बावा*
*जागतिकीकरण ''*

(प्रेमाचे होऊ द्या जागतिकीकरण / नंतर आलेले लोक - 41 )

रंगनाथ पठारे म्हणतात त्याप्रमाणे, "शोषितांचा पक्ष मांडणारी ही कविता वर्तमान वास्तवाचा विरुप, क्रूर, अन् पिसाट चेहरा थेटपणं मांडते. साहाजिक तिची भाषा ही वर्तमानाची भाषा आहे. अडाणी खेडुताच्या वा शहरातल्या दलदलीच्या नरकात राहणाऱ्या झोपडपट्टीतल्या माणसाच्या भाषेपासून ते संगणक वापरणाऱ्या भद्र लोकांच्या भाषेपर्यत असा तिचा विस्तृत पट आहे. भद्र लोकांच्या भाषाव्यवहाराचा एक आयुध म्हणून वापर करत वर्तमान वास्तवातलं अभद्र ओंगळ सगळं ती निधडेपणानं समोर आणते."[4]

एका समाजात आपण किती वाईट, क्रूर चालले आहोत. हे कवितेतून स्पष्ट होते. काळे यांनी जागतिकीकरणाचे विविध वर्णन कवितेत केल्याचे आढळते

जगतिकीकरणाच्या प्रक्रियेतील उपेक्षित मागासलेल्या-वंचित वर्गाचे चित्रण अरुण काळे यांनी केलेले आहे, माणूस हा धर्म, जात यांच्या भेदाभेदीने ग्रासला आहे. उच्च-निच्च, श्रीमंत-गरीब अशा धर्म-जाती यांच्या युद्धखोरीमुळे माणूस दुखावला आहे. माणसाला जगता येत नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. जागतिकीकरणाची झिंग आणि माहिती तंत्रज्ञानाचा हंगामा या साऱ्यांत सामान्य माणसाचे शोषण होत चाललेय. असा सामान्य माणूस केंद्रवर्ती ठेवून आणि त्याची बाजू लावून, धरुन अरुण काळ्यांची कविता प्रकट होत राहते.

### 3. स्त्री जीवन

अरुण काळे यांच्या कवितेत स्त्रियांची वेगवेगळी व्यक्तीचित्रणे आली आहेत. आई,पत्नी, प्रेयसी या नात्यांच्या स्त्री बरोबर तसेच कुटूंबासाठी नाचणाऱ्या शरीराची विक्री करणाऱ्या, आपल्या भावना बाजूला सारुन कुंटूंबासाठी आपले स्वत:चे जीवन उध्द्वस्त करणाऱ्या अशा अनेक स्त्रियांच्या जीवनाची चित्रणे अरुण काळे यांच्या कवितेत साकार झाली आहेत.

*" आई ! मी एकदाच रडलो मनापासून*
*माझ्यासाठी अन् तुझ्यासाठी*

*जेव्हा तू घेऊन आली होतीस*

*सुजलेले पाय*

*राईस मीलच्या नोकरीवरुन*

*चार आया, ञाया जमून*

*म्हणत होत्या देवाची मर्जी ''*

( आईसाठी / रॉकगार्डन - 54 )

असे हे आईचे व्यक्तिचित्रण प्रकट होते. आई विषयी अनेक कविता निर्माण झाल्या. त्यामुळे 'आंई ' या कवितेवरती कविता लिहिल्या गेल्या. आई ही स्त्रीजीवनातील महत्वाचा घटक आहे. आईविषयी सर्वांना मनात प्रेम व श्रध्द, माया असते. काळ्यांच्या कवितेत आईचे वेगवेगळी रुपे दिसतात. ही लढणारी आहे. या आईचा लढणे हा तिचा महत्वपूर्ण गुण दिसून येतो. हा गुण ती आपल्या मुलांनाही शिकविते.

'सायनरचे शहर ' मधील आईचे एक व्यक्तिमत्व मधून स्त्री चे एक अनोखे रुप पहायला मिळते. स्त्री ही वाघिणीसारखी मजबूत आहे.या व्यक्तिमत्वाची दोन रुपे समोर येतात. एक कौटुंबिक दुसरे चळवळी.

*'' तर*

*जयंतीच्या गाण्यात*

*कव्वालीच्या सामन्यात*

*तू हसतानाही लावला*

*तोंडाला पदर ''*

( आई : एक व्यक्तिमत्व / सायरनचे शहर -23 )

अशाप्रकारच्या कौटुंबिक व्यक्तिचित्रणातून दारिद्रय समोर येते. मुलांनाच सर्वस्व मानणाऱ्या आईचे नवे रुप आजच्या पिढीला समजते. एके ठिकाणी दंगल घडलेली दिसून येते अशा वेळी आईची प्रतिक्रिया दिसते.

*" अंधाराला चिरीत तुझा आवाज आला*

*तुम्ही झोपा बिनधास्त*

*मी हाये जागी*

*रात्री केव्हातरी खडबडून जाग*

*आली आम्ही ऐकली तुझी*

*आरोळी, पाहिली तुझ्या हातात*

*चमकलेली बिजली "*

( हेच माझे डाग / सायरनचे शहर - 23-24 )

काळे यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापक आहे. त्यांच्या कवितेतून ' आई ' अशी स्त्रीची अनेक रुपे चित्रित झालेली आहेत. रंगनाथ पठारे म्हणतात. "नंतर आलेले लोक ही शीर्षकस्थानाची कविता केंद्रस्थानी मानून या संग्रहातील कवितांकडे पहाणं शक्य आहे का ? संग्रहातील कविता कोणाविषयी अन् कशाविषयी बोलत आहे ? ती कोणत्या काळासंबंधी बोलत आहे. ? ती कोणत्या लोकांविषयी बोलत आहे ? तिच्या भाषेची जातकुळी कोणती आहे? तिचा स्वर कसा आहे ? ती कोणत्या प्रकारचे प्रश्न मांडते अन् कोणते प्रश्न उपस्थित करते ? या कवितेची आपल्याला भिडण्याची रित कोणती ? असे काही प्रश्न उपस्थित करत या कवितेत शिरण्याचा प्रयत्न करावा लागतो..... या ना त्या प्रकारे नंतर आलेल्या लोकांसंबंधी आधीच्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून कवी या संग्रहात बोलतो का ? असा प्रश्न उपस्थित केला तर जवळपास नकारार्थीच उत्तर मिळतं, कवी दलितांच्या जगण्यातील दु:ख, वंचना यांची मांडणी करतो हे खरं पण ती फक्त दलित जातीपुरती नाहीय. त्यामुळे रुढ अर्थाने ही दलित कविताच नाहीय."[5]

स्त्री जीवनातील व्यक्तिचित्रणात 'लहानीबाय' या स्त्रीची कहानी सांगता येईल. लहानीबाय स्त्रीसत्तेची प्रतिनिधी म्हणून ओळखली जाते. लहानीबाय लग्नानंतर सहा महिन्यातंच विधवा होते. नवरा मेल्यानंतर या स्त्रीने मंगळसूत्र काढले नाही आणि कुंकू लावणे ही सोडलेले नाही.

यावरुन तिचं व्यक्तिमत्व सिध्द होते. शारिरीक गरजेची भावना म्हणून तिचे अनेक पुरुषाशी संबंध आले. तिला चार मुले होती. या चार मुलांना तिने ज्या व्यक्तीपासून ही मुले झाली त्याचे नाव न घेता मेलेल्या नवऱ्याचे नाव लावले. या मुलांच्या वाटेला कोणी गेले तरी त्यांना ती धमकावते, फाडून खाते, पुरुषानांही आव्हान देते, आजूबाजूस काही गडबड झाली तर मध्यस्थी करुन ती मिटवते. निवडणूकीवेळी उमेदवार तिच्याकडे आशीर्वाद घ्यायला येतात. स्त्रियांचे मतदान करुन घेणे तिच्याकडे असते.मोर्चे-उपोषण ,मंडळ - यांत ती सर्वांच्या पुढे असते . कुणी गरीबाला छळत असेल तर ती त्याचा जाब विचारते. सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ती लढते. लहानीबाय ही कामावर विश्वास ठेवणरी स्त्री आहे. उगाचच ती कुणाला घाबरत नाही आणि लोकांनी सांगितले तर मागे वळत नाही असे या लहानीबाय या स्त्री चे व्यक्तीमत्व होते.

*" जयंती, सभा,*
*रॅलीमध्ये तिला भाषणाचा*
*आग्रह होतो आणि ती म्हणते*
*तोंडाची वाफ कशाला दवडू ?*
*माझा कामावर विश्वास हाय*
*आपल्याला कोणाला नडायचं नाय*
*सगळे लोक म्हणतील तवा*
*मागं हटणार नाय "*

(लहानीबाय लार्जर दॅन लाईफ / नंतर आलेले लोक - 29 )

अशी ही लहानीबाई जगण्याला मोकळेपणाने पुढे आली. जगता जगता सामोरे गेली.आणि वाढता वाढता 'लार्जर दॅन लाईफ' झाली.अरुण काळे स्त्रीवर झालेल्या अन्यायाविरुध्द पेटून उठतात. स्त्री ला कमी समजणाऱ्यांना ते धिक्कारतात. स्त्रीला पुरुष व्यवस्थेच्या गुलामातून बाहेर पडण्याचे आवाहन करतात.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला साथ देणाऱ्या

रमाबाईचे ह्या दृष्टीने लक्ष वेधतात. सर्वसामान्य स्त्री सारखीच जगणारी रमाबाई त्या दृष्टीने लक्ष वेधतात. सर्वसामान्य स्त्री सारखीच जगणारी रमाबाई पण तिचा मोठेपणा अरुण काळे प्रकट करतात.

*'' भौतिक जगाच्या सुखाच्या*
*भिंती ओलांडून*
*स्त्रीमुक्तीच्या उद्‌गात्याची पाठराखीण*
*किती एकरुप होऊन*
*अंग चोरुन बसलीय*
*त्या ग्रुपफोटोतही*
*बुधस्त्रीसारखी शांतपणे....*
*विकारावर विजय मिळवलेली*
*म्हणूनच आज मुक्त स्त्रिया*
*भिंतीला खेटल्याप्रमाणे बसतात.''*

(रमाई / सायरनचे शहर, - 46 )

काळे जगात जगणाऱ्या वेश्येला माणूसपणाच्या दृष्टीने पाहतात. स्त्रीजातीची, सहजीवनाची अनेक रुपे त्यांच्या कवितेत बघायला मिळतात. त्यांच्या कवितेत स्त्रिया, पत्नी, प्रेयसी, मुलगी असे नातेसंबंध घेऊन प्रकटत नाहीत तर ती 'स्त्री' आहे व तिच्याशी मानवी माणसासारखे कवीचे नाते जुळले आहे. याचे चित्रण काळे यांनी कवितेतून करुन दिले आहे. काळेंच्या कवितेत वेश्या या स्त्रीविषयी एक कळवळा साकार होते. काळे वेश्याविषयी एक आपुलकीची भावना व्यक्त करतात. या जाणिवेतून स्त्री जीवनाविषयीचे चित्रण कवितेतून झालेले दिसून येते.

**4. महानगरीय जीवन**

कवी अरुण काळे यांच्या सायनरच्या शहरातील महानगरीय जीवन हे एक अक्राळविक्राळ रुप साकार केले आहे. सायरनच्या शहरातील महानगरीय जीवन हे सर्व सामान्यांच्या हिताला परवडणारे नाही ते महानगरीय जीवन आहे. दंगल, दडपशाही, दहशत या वास्तवाचे भयकारी दर्शन घडविण्याच्या व्यक्तीचे आहे, महानगरीय वस्ती अनके जात,धर्म,पंथानी वाढलेली आणि वेढलेली आहे. महानगरीय जीवनात पोटासाठी पुढे पुढे धावणाऱ्यांच्या मागे मरण लागलेले आहे असे जाणवते. या शहरात माणसाच्या सुरक्षिततेची कोणतीच हमी या शहरात देता येत नाही. रक्ताचा रंग सारखाच आहे. पण तरीही एकमेंकाविषयी द्वेष वाढला आहे, दंगल होते आहे घरांच्या जळण्याचा वास सर्वत्र पसरलेला आहे. महानगरीय वास्तवाचे उग्रभीषण दर्शन घडविणे एवढेच कवीचे कार्य नाही तर महानगरीय समाजात घडणारे अनेक हिंस्त्र आणि अमानुष शक्तीचे, युध्दखोर शक्तीचे प्रतीक ठरते. भयसूचक चेहऱ्याचे दर्शन समाजजीवनाला रक्तबंबाळ करीत असते. अशा चेहऱ्याचे दर्शन ‘सायरनचे शहर’ मधील कवितेने केलेले आहे. काळे यांच्या कवितेबद्दल महेंद्र भवरे म्हणतात, “अरुण काळे यांच्या कवितेत सायरनच्या शहरातील बदलत जाणाऱ्या माणसाचे संदर्भ ,माणूस आणि त्याचे जगणे, माणूस आणि त्याचे व्यक्तिमत्व याचे क्ष-किरणच वाचकापुढे ठेवले गेले आहे. माणसाच्या सृजनशील आणि विध्वंसक रुपाचे दर्शन त्यांच्या कवितेत घडते. माणसाची महानता आणि मलिनता, माणसाची उक्रांती आणि पशुत्व, संस्कृतीचा शिल्पकार आणि विकृतीचा निर्माता, माणसाशीच पाठ फिरवणारा अशी माणसाची विविधरुपे साकार झाली आहेत. माणसाचे सामर्थ्य आणि मर्यादा यांचा लपंडाप कविताभर विखुरलेला आहे. महानगरीय वस्तीत पोटासाठी राबणारे जीवावर मरण उदार झालेले असल्यामुळे जगण्याची कोणतीही निश्चिती शहरात उरत नाही. तसेच या शहरात धोक्याची संकटाची ,सूचना देणारे सायरनचे आवाज शहरभर पसरलेले आहे .”[6]

*"भरदुपारी सुनसान रोड आज*
*रवंथ करीत पडलाय अजगरासारखा*
*पाखरही वळचणीत भांबावलेली*
*रोज रहदारीत बसणारी गुरं -*
*कुत्री आज गायब जणू नामशेष*
*मुक्या मारातून शिणका उठाव्यात*
*तसे वाजतात सायरन*
*हे शहर आता वाटतेय सायरनचे .... "*

( सायरनचे शहर / सायरनचे शहर -10 )

या शहरातला माणूस परका झालेला आहे . माणसाच्या मुलभूत गरजांही पूर्ण झालेल्या नाहीत त्यामुळे माणूस त्रासलेला आहे. माणूस म्हणून जगणे अवघड झालेले आहे. समाजातील शहराला एक नवी दिशा प्राप्त होण्यापूर्वीच शहराने आक्राळविक्राळ रुप धारण केले आहे. म्हणून माणसाला धिक्कारणाऱ्या शक्तीचे रुप सायरनच्या शहराला प्राप्त झाले. समाजाला एखाद्या वाईट गोष्टीत अडकवून टाकणे हे अनेक वेगळया शक्तीच्या गरजेचे असते. अशा परिस्थितीवेळी वाईट वागणाऱ्या लोकांनाही वेगळी भूमिका घेण्याचे बळ येते. जगामध्ये सत्ता जात, धर्म यांबद्दल टोकाचे आकर्षण निर्माण होऊन रक्तपात झालेला दिसून येतो. विज्ञानाच्या विकसनशीलतेमूळे जग हे अधिक जवळ येवू लागलेले आहे. तसतशी युध्दाची परिस्थिती वाढलेली आहे. जो तो आपल्या अणुशस्त्रांनी दुसऱ्या देशाचा विनाश करण्याचा मार्ग अवलंबतो आहे. जग जवळ आले तरी माणसामधील आपलेपणाची भावना कमी होत चाललीय. जात, धर्म, सत्ता, यासाठी माणसाचा उपयोग एक वस्तू म्हणून केला जातोय.

*" तश्या काही खास जागा असतात*
*जिथं हमखास येत असते खाज*
*निर्मीतीचा ईश्वर असतो माज*

*खाज क्षेत्रं होतात तीर्थक्षेत्रं*

*द्वेषाभिमानाची देऊन अंधारी*

*जात धर्म, वंशाच्या....*

*घोड्यांना नाचवलं जा ''*

( खाजवण्याच्या जागा / सायरनचे शहर - 8 )

अतिरेक्यांची मुळे जात, धर्म, सत्ता आणि भूक या घटकास सामावलेली असतात. असे मत सायरनच्या शहरातील कवितेने मांडलेले आहे. युध्दामुळे प्रश्न, गोळ्या, रक्त आणि माणसाची राख इत्यादी घटक अतिरेक्यांच्या रुपाने दिल्या आहेत. अतिरेक्यांचा चेहरा हा वाचकांपूढे सतत उभा राहतो. अतिरेक्यांच्या या गटाने शासनव्यवस्था ही कोलमडलेली दिसून येते. अशा या अतिरेक्यांच्या भीतीमूळे माणसे, माणसाची मते ही कोलमडलेली दिसून येतात. त्यामूळे माणसाच्या मनाचा आणि भावनांचा विचार केला जात नाही.

*'' आतंक*

*देशाच्या छाताडावर बसलेलं घुबड*

*लोकशाही*

*दु:खाच्या झाडावर बसून वाढणारं स्वप्न*

*नागरीक आणि श्वापदं एकत्र*

*ही युध्दभूमी जातधर्माची*

*सत्ताकांक्षीची, पोटांची ''*

(फांद्याकडून मुळाकडे जायचे झाल्यास / सायरनचे शहर, - 27 )

अरुण काळे यांच्या कवितेत महानगरीय जीवन प्रकटलेले आहे. महानगरातील कष्टकऱ्यांचे जीवन फारसे, त्यांची भावना, त्यांचे प्रश्न, 'नंतर आलेले लोक' मधील कवितेत स्पष्ट होत आहे. अनेक रुपे काळे यांच्या या कवितेत आलेले आहेत. कष्टकऱ्यांच्या विशिष्ट

अनुभवांशी एकरुप होण्याची काळे यांची वृत्ती असल्यामुळे कष्टकऱ्यांच्या जगातील अनेक अनुभव त्यांनी कवितेतून मांडलेले आहेत. 'लहानीबाय : लार्जर द लाईफ', 'रिकाम्या बाटलीसारखा' 'स्पॉन्डिलायटीस्', 'माणसाचं माळरान होतंच शेवटी', 'बारकोडींगवाल्या मुली', 'शहर,महामार्ग,'पाऊस', काही फरक पडत नाही अशा बऱ्याच कवितेतून महानगरीय जीवन प्रकटते. महानगरातील सामान्य माणसाची वाटचाल असूनही वाईट जीवनच वाट्याला आलेले आहे. एका बाजूला प्रगती, आधुनिकता यांचा कितीही विकास झालेला आहे तरी आपल्या बाजूला अमान्य माणूस प्राण्यासारखे जीवन जगतो आहे हे विदारक चित्र नाकरता येत नाही.

*"हे कुठंही झोपणारे, रात्रभर खोकणारे*
*हे शाळा नसलेले बेवारस कुत्र्यांसोबत वाढणारे*
*हे भरल्या संसारातून पळून गेलेले*
*कुणालाही बच्चा म्हणणारे*
*ह्या मंदबुध्दीला गर्भवती मादया*
*यांच्या गर्भाला नसतो कर्ता - धर्ता*
*ह्या उदरनिर्वाहासाठी झोपणाऱ्या*
*सकाळी तोंड सुजून उठणाऱ्या*
*हे निरंकारी किंवा मनोरुग्ण*
*कोण करणाहे यांच्या चेहऱ्यांची*
*साफसफाई "*

(काही फरक पडत नाही/नंतर आलेले लोक - 64 )

काळे यांच्या कवितेत महानगरीय सामान्य माणसाच्या जीवनाचे चित्रण येते. या सामान्य माणसाचे जीवन फारसे कुणी मनावर घेत नाही. या माणसासमोर मांडून ठेवलेली व्यवस्था त्याला जगू देत नाही. महानगरी जीवनाच्या वाईट आणि विद्रूप संस्कृतीचा नकार काळे यांच्या

कवितेतील महत्वाची जाणीव आहे.

*" न हलले काय कुणी शतक आलं काय*
*न आलं काय काही फरक पडत नाही "*

(काही फरक पडत नाही/ नंतर आलेले लोक - 63 )

प्रत्येकजण स्वत:चे हित बघू लागला आणि चंगळवादी बनू लागला

*" आता लोक अन्न खूपच फेकतात*
*आणि दारंही कायम बंद ठेवतात*
*असल्या दारांसमोर कुत्रंही उभं नसतं "*

(बंद दारासमोर कुत्रही उभं राहात नाही/ नंतर आलेले लोक - 61 )

अशा शब्दात व्यक्त होतो.

## 5. जातीय ऐक्याची जाणीव

कवी अरुण काळे यांनी जात, पात, धर्म, पंथ याबद्दल समाजात घडणाऱ्या जातीय घट्नेचे सविस्तर चित्रण आपल्या कवितेतून केलेले आहे. समाजात वेगवेगळ्या धर्माचे, जातीचे लोक राहतात. त्यांच्यामध्ये जातीय ऐक्याची भावना निर्माण होते त्यामूळे येथे एकाग्रता करुन आपले उदरनिर्वाह करीत असतात. समाजात ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य,शुद्र या जातीचे लोक राहतात. प्रत्येक जातीतील माणूस हा आपल्या स्वार्थासाठी जगत असतो. काळे यांनी 'सायरनचे शहर' या कवितेतून या जातीय ऐक्य चा दाखला दिलेला दिसून येतो.

अशा वाईट अवस्थेमुळे ईश्वर हा मंदिरात नाही. पक्षांची घरटी विस्कटलेली आहेत. त्यामुळे त्या घरट्यात एकही पाखरु नाही. सर्व पाखरे उडून गेलेली आहेत. हे मतलबी जग स्वत: डोळ्यांनी पाहतो आहे. विस्कटलेल्या, बुरसटलेल्या, विचारांच्या मंथनातून धर्मासाठी, जातीसाठी जातीय दंगली, भांडणे, जाळपोळ, मोर्चा, संप अवेळी पेट घेत आहेत. पण विझत मात्र नाहीत. असा कवींना अनुभव आलेला दिसून येतो. काळें मांडतात की जात, पात, धर्म, पंथ याबद्दल ऐक्याची भावना निर्माण करण्यासाटी कोणकोणते प्रयत्न केलेने या जातीय

ऐक्याची भावना होवू शकेल. धर्म, जातीभेद यातून निर्माण झालेला वाद या दंगलीतून अनेकांचे बळी गेलेले आहेत.

*तेच असतात काचेचा मेंदू पाळून*
*सुखदु:खाला लंगोटीत ठेवून*
*त्याचा नसतो पक्ष, नसते संघटना*
*ते मानीत नाहीत धर्म अगर तत्व,बित्व*
*त्यांची नसतात प्रार्थना मंदिरे*
*द्वेषाभिमानांचे अड्डे*
*ते करीत नाहीत जिंदाबाद / मुर्दाबाद*
*त्याचा नसतो कुणी हृदयसम्राट*
( त्यांना वेडे म्हणणे वेडेपणाचे / सायरनचे शहर - 38 )

## 6. आर्थिक विषमता आणि चंगळवादी वृत्ती

समाज, राजकारण अशा सर्व क्षेत्रात वेगळी स्थिती निर्माण झालेली आहे. आर्थिक सामाजिक व्यवस्था मोडलेली दिसून येते. काळे यांनी अनेक कवितेतून आर्थिक विषमतेची मांडणी करुन दिलेली आहे. त्यामुळे शहरातील घटना या मानवी जीवनाला कलाटणी देणाऱ्या आहेत. शहरातील वाढलेला ताण-तणाव त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ झालेली दिसून या शहरात हिंसा आणि अमानुष शक्तीचे प्राबल्य वाढलेले दिसते. आर्थिक विषमतेत नोकरशाही, सावकारी, सामंतशाही या सर्वांनी हा प्रदेश पोखरला आहे म्हणून हा प्रदेश म्हाताऱ्या त्वचेसारखा दिसत आहे. आर्थिक विषमतेत धर्म, जात नितीमत्ता म्हणून स्वीकार करणारे घटक आर्थिक विषमतेत येतात. आर्थिक विषमतेमूळे कनिष्ठ वर्गातील लोकांचे नुकसान झालेले दिसून येते. शहरातील वस्त्यांत धर्म, समाज, राजकारण, सांस्कृतिक क्षेत्रे, वस्त्या, माणसे, टोळ्या या घटकांचा समावेश आर्थिक विषमतेत झालेला दिसून येतो. महानगरीय वस्ती अनेक जाती-धर्म पंथानी, वाढलेली आणि वेढलेली आहे. महानगरात पोटासाठी पुढे-पुढे

धावण्याऱ्यांच्या मागे मरण लागलेले आहे. हे शहर निपराध लोकांचे नसून या शहराने माणसाच्या व्यवस्थेची हमी दिली जात नाही. या आर्थिक विषमतेने महानगरीय वास्तवाचे उग्रभीषण दर्शन घडविणे एवढेच कवींचे कार्य नाही तर महानगरीय समाजात घडणारे अमानुष कृत्य, युध्दखोरी, चंगळवाद इत्यादी गोष्टी कवी सर्वार्थाने प्रकट करण्याचा प्रयत्न करतो आहे. महानगरात आर्थिक विषमतेची वाढ झालेली दिसून येते. ही गोष्ट महानगरीय समाजजीवनाला रक्तबंबाळ करीत आहे.

" अर्धशिशीसारखे सकाळी उठणारे
*रात्री दोन घास निवांत खाणारे*
*मौजमजेत जगणारे हे शहर*
*काल इथं कली शिरला माणसात*
*मात्र लेकरं एकमेकाला धरीनात* "

( सायरनचे शहर /सायरनचे शहर - 10 )

या शहरातील आर्थिक विषमतेमूळे अनेक क्षेत्रे विस्कटून गेलेली दिसून येतात, औद्योगिकीकरण, कारखानदारी यांना आर्थिक विषमतेमूळे मोठे नुकसान सहन करावे लागलेले आहे. महानगरात अजूनही जातीयता,दारिद्र्य, आर्थिक विषमता यांची झळ कमी झालेली नाही. जात अणि धर्माचा माणसाच्या शोषणसाठी साधन म्हणून वापर करण्याची परंपरा या देशात आहे. आतंक हा हातात हात घालून प्रवास करीत आहे. तसेच शास्त्राच्या जोडीला शस्त्रे असल्यामुळे माणसाचे मरण अधिकच सोपे झाले आहे.

अशा तऱ्हेने काळे यांनी आपल्या कवितेतील वेगवेगळ्या पध्दतीने आशयसूत्रांची मांडणी व्यवस्थितरित्या करुन आशयसूत्रांची विविधता ही स्पष्ट करुन दाखविलेली आहे. त्यामुळे अरुण काळे यांच्या कवितेतून एक वेगळी जाणीव मिळते.

प्रकरणाचा सारांश :

या प्रकरणांमध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रांचा विचार केलेला आहे. अरुण काळे यांच्या कवितेत विविधता दिसून येते. आंबेडकरी विचारप्रेरणा, जागतिकीकरण, उपेक्षित-वंचित- वर्गाचे चित्रण, स्त्रीजीवन, महानगरीय जीवन, जातीय ऐक्याची जाणीव, अर्थिक विषमता आणि चंगळवादी वृत्ती अशी अनेक आशयसूत्रे विचारात घेतल्यानंतर या आशयसूत्रांचे अनेक विशेष समोर येतात. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. अरुण काळे यांच्या कवितेत आशयसूत्रांचा विविधता आहे.एकसुरी,साचेबंद आशयसूत्रात अडकलेल्या मराठी कवितेला आशयसूत्रांची विविधता अरुण काळे यांची कविता देते.

2. अरुण काळे हे कवी आशयसूत्रांची निवड वास्तवाच्या जाणिवेतून करीत असल्यामूळे आशयसूत्राला संपन्नता पूर्ण प्राप्त होते. या आशयसूत्रांतून काळे हे वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. काळे यांची कविता महानगरीय अनुभव,जाणिवा प्रकट करणारी कविता असली तरी ती तेथेच थांबत नाही. तर मानवी जीवनावर आधारित परिस्थितीचा शोध ती घेते.

3. अरुण काळे यांच्या कवितेची आशयसूत्रे वेगवेगळी असलेली दिसतात.

4. अरुण काळे यांच्या कवितेत सामान्य माणसांचे चित्रण,वंचित वर्गाचे चिंत्रण ,

5. स्त्रीजीवाचे चित्रण, यांसारखी आशयसूत्रे प्रकट होतात. यादृष्टीने अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेवण चटकन नजरेत भरते.

5. आशयसूत्रांची विविधता यांमूळे अरूण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण अधिक ठसठशीत होते.

अरूण काळे यांच्या कवितेच्या आविष्कारतंत्रांच्या आणि भाषा - शैलीच्या दृष्टीने वेगळेपण या पुढील दोन प्रकरणांतून आपण पाहणार आह्मेत.

## संदर्भ

1. मोतीराम कटारे, *अरुण काळेच्या कवितेतील चळवळ*, नवाक्षर दर्शन, वर्ष 4, अंक 3-4, एप्रिल ते सप्टेंबर, 2008 पृ. 40

2. नितिन भरत वाघ, *इन सर्च ऑव्ह रुटस्*, नवाक्षर दर्शन, वर्ष 4, अंक 3-4, एप्रिल - सप्टेंबर, 2008 पृ. 54-55

3. भास्कर लक्ष्मण भोळे, *नंतर आलेले लोक : समकालीनतेचे आव्हान यथार्थपणे, समजून घेणारी कविता*, युगवाणी, जाने-मार्च 2007, पृ. 77-78

4. रंगनाथ पठारे, *इतिहासाचा विषाणू दाखविणारी कविता : नंतर आलेले लोक*, संवादिनी, महाराष्ट्र फौंडेशन, 2007 पृ. 79

5. महेंद्र भवरे, *दलित कवितेतील नवे प्रवाह*, श्रीरामपूर, शहरालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, फेब्रु. 2001 पृ. 121